RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १३] शुक्रवार, फेब्रुवारी ३, २०२३/माघ १४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ फेब्रुवारी २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२१/प्र.क्र.-४४०/म-१(धोरण).—ज्याअर्थी, खासरा क्रमांक. २/२, ३३/१, ३१/२, ३६/२, ३७/२ व ३८/४, मौजे वांजरा, तालुका व जिल्हा नागपूर येथे स्थित असलेली ६.६४ हेक्टर्स आणि खासरा क्रमांक. ५७/२, ५६/३ व ६७/१, मौजे म्हसाळा, तालुका कामठी, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेल्या २.२१ हेक्टर्स जमिनीपैकी, एकूण ८.६४ हेक्टर्स जमिनीच्या भाडेपट्ट्याचे, १ जुलै, २०२१ ते ३० जून, २०८१ या कालावधीसाठी नूतनीकरण करण्याकरिता, भाडेपट्टाकार म्हणून जिल्हा उद्योग केंद्र (डी आय सी), नागपूर आणि भाडेपट्टादार म्हणून नागपूर औद्योगिक वसाहत सहकारी संस्था (एन आय इ सी एस एल) यांनी भाडेपट्टा करार (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त भाडेपट्टा करार" असा केला आहे) केला आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, एकूण ८.६४ हेक्टर्स क्षेत्रफळ असणारी जमीन (डी आय सी ची मालकी असलेली) १ जुलै, २०२१ ते ३० जून, २०८१ या कालावधीसाठी साठ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यासाठी, भाडेपट्टाकार म्हणून जिल्हा उद्योग केंद्र (डी आय सी), नागपूर आणि भाडेपट्टादार म्हणून नागपूर औद्योगिक वसाहत सहकारी संस्था लिमिटेड (एन आय इ सी एस एल) यांच्यामध्ये करण्यात आलेल्या उक्त भाडेपट्ट्यावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद ३६ च्या खंड (चार) अन्वये आकारणीयोग्य असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती, पुढील शर्तींच्या अधीन राहून, माफ करीत आहे :—

**शर्त–**

या आदेशान्वये, ज्याला मुद्रांक शुल्कात सवलत उपलब्ध आहे तो, उक्त भाडेपट्टा कराराचा पक्षकार, त्याच व्यवहारासाठी अन्य कोणत्याही आदेशानुसार किंवा धोरणानुसार मुद्रांक शुल्क माफ करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी हक्कदार असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 3rd February 2023.

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank -2021/C.R.440/M-1 (Policy).—Whereas, District Industries Center (DIC), Nagpur as a Lessor and Nagpur Industrial Estate Co-operative Society Ltd. (NIECSL) as a Lessee have entered into Lease Deed (hereinafter referred to as “the said Lease Deed”) for renewal of lease of total 8.64 hectors of land out of which 6.64 hectors located at Khasra No. 2/2, 33/1, 31/2, 36/2, 37/2 and 38/4, Mouja Wanjara, Taluka and District Nagpur and 2.21 hectors located at Khasra No. 57/2, 56/3 and 67/1, Mouja Mhasala, Taluka Kamthi, District Nagpur for a period from 1st July 2021 to 30th June 2081.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as “the said Act”), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty and penalty in whole as chargeable under clause (*iv*) of Article 36 of Schedule I appended to the said Act, on the said Lease Deed of a total land parcel admeasuring 8.64 hectors (belonging to the DIC) on a lease of sixty years for a period from 1st July 2021 to 30th June 2081, between the District Industries Center (DIC), Nagpur as a Lessor and Nagpur Industrial Estate Co-operative Society Ltd. (NIECSL) as a Lessee, subject to the following condition, namely :—

*Condition*—

The party to the said Lease Deed, which has availed concession in stamp duty under this Order, shall not be entitled for remission or reduction of the stamp duty for the same transaction as per any other Order or policy.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.